

**माहे मार्च 2021 मासिक अहवाल**

**खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 1 | ठाणे ग्रामीण | ब्राउनी | 1) पोहवा / 2482 आर. बी. गवळी<br>2) पोशि / 979 एम. बी. पठाण | तुळींज पो. स्टे. गु.र.नं.291/2021 भा. द. वि. कलम 302 हा गुन्हा दि. 1/3/2021 रोजी 04:30 ते 05:00 वा. चे सुमारास घडला असुन सदर गुन्हयातील घटनास्थळावर धारदार चाकू मिळून आला. पोलीस स्टेशनचे स्टाफने ताब्यात घेतलेल्या 03 संशयीत इसमांसोबत इतर 05 इसमांसह उभे करून चाकूचा वास श्वान ब्राउनी हीस दिला असता श्वान ब्राउनी हीने प्रत्येक इसमाचा वास घेत संशयीत इसमाचे अंगावर उडी मारून इशारा दिला. पुन्हा सदर इसमांची जागा बदलून पुन्हा ओळखपरेड घेतली असता पुन्हा सदर इसमाच्याच अंगावर उडी मारून इशारा दिला. सदर इसमाकडे तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 2 | ठाणे ग्रामीण | ब्राउनी | 1) पोहवा / 2666 एस. के. डिके<br>2) पोशि / 815 एस. जे. गुरखे | टोकावडे पो. स्टे. गु.र.नं.42/2021 भा.द.वि. कलम 363 हा गुन्हा दि. 20/3/2021 रोजी 17:00 वा. चे सुमारास घडला असुन सदर गुन्हयातील घटनास्थळावर पिडीत मुलीचा सँडल मिळून आल्याने त्या सँडलचा वास श्वान ब्राउनी हीस देवून सोडले असता श्वान ब्राउनी जंगलात 4 ते 5 किमी मागोवा घेवुन एका अंब्याच्या झाडाखाली येवुन घुटमळू लागली. तिथे अंमलदारांनी शोध घेतला असता तेथे सदरची मुलगी मिळून आली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 3 | बुलढाणा | ज्युली | 1) पोना / 2053<br>राजेश पदमाणे<br>2) पोना / 11<br>बाळु सुरूसे | बिबी पो. स्टे. गु.र.नं.54/2021 भा.द.वि. कलम 302 हा गुन्हा दि.26/3/2021 रोजी 08:00 वा. चे पुर्वी घडला असुन सदर गुन्हयातील घटनास्थळावर<br>´ÖÞŸÖ?úÖ“µÖÖ ?ÖôûµÖÖ¾ÖÕüß»Ö<br>एक सुती दोरीचा वास श्वान ज्युलीस दिला असता श्वानाने 50 मीटर पर्यत वास घेत झाडाखाली बसलेल्या इसमाजवळ जावुन थांबला. त्यावरून गुन्हा उघडकीस येणेस मदत झाली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 4 | भंडारा | नॉटी | 1) पोना /177 प्रल्हाद ढोरे | पालांदपूर पो. स्टे. गु.र.नं.28 /2021 भा.द.वि. कलम 454,457 हा गुन्हा दि.14/3/2021 चे रात्री ते दि.16.03.2021 चे 12:00 वा. चे दरम्यान घडला असुन सदर घटनास्थळावर मिळून आलेल्या बांबूचा वास श्वान नॉटी यास दिला असता श्वान गुरांच्या गोठयात जाऊन अंगणामधून वळून 50 ते 60 फुट अंतरावर असलेल्या घराजवळ जाऊन भुंकू लागला. सदर घरातील इसमाकडे तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 5 | पुणे ग्रामीण | सिबा | 1) पोहवा /443<br>जी. बी. फापाळे<br>2) पोशि /2624<br>बी. एस. चौधरी | लोणी काळभोर पो. स्टे. गु.र.नं.158/2021 भा.द.वि. कलम 380 हा गुन्हा दि.11/3/2021 रोजी 11:00 वा. ते रात्री 09:00 वा. चे दरम्यान घडला. घटनास्थळावर एक स्टिलचा डबा व चार्जर मिळून आला. सदर वस्तुचा वास श्वान सिबा यास दिला असता श्वान घरामध्ये फिरुन फिर्यादीच्या नव-याच्या मित्राजवळ येऊन थांबला. त्यावरुन सदर गुन्हा उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 6 | पुणे ग्रामीण | सिबा - डॉबरमन | 1) पोहवा /443 जी. बी. फापाळे<br>2) पोशि /2624 बी. एस. चौधरी | हवेली पो. स्टे. गु.र.नं.63/2021 भा.द.वि. कलम 302,201 हा गुन्हा दि.26/3/2021 रोजी 09:45 वा. चे सुमारास घडला असून घटनास्थळावर एक शाल मिळून आली. सदर शालचा वास श्वान सिबा यास दिला असता श्वान कॅनलच्या पाऊलवाटेने खडकवासला धरणाच्या अलिकडे भाजी मंडईजवळ येऊन थांबले. श्वानास पुन्हा वास दिला असता श्वान नांदेड खडकवासला रोडवर येऊन थांबले. सदर गुन्हाबब उघडकीस आल्यानंतर श्वानाने दाखविलेला मार्ग बरोबर होता. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 7 | नंदुरबार | ऐंजल - डॉबरमन | 1) पोहवा /283 दिलीप संतोष गावीत<br>2) पोशि /656 भिमसिंग दामजी गावीत | धडगांव पो. स्टे. गु.र.नं.126/2021 भा.द.वि. कलम 302 हा गुन्हा दि.22/3/2021 रोजी 20:00 वा. ते दि.23/3/2021 रोजी 09:30 वा. घडला असून घटनास्थळावर मिळून आलेल्या कोयत्याच्या मुठीचा वास श्वान ऐंजल यास दिला असता श्वान घराबहेर पडून जाळीच्या कंपाऊंड बाहेर जाण्याचा प्रयत्न करु लागला. श्वानास जाळीच्या पलीकडे नेऊन पुन्हा कोयत्याच्या मुठीचा वास दिला असता श्वान शेतातून पायावाटेने मेन रोडवर येऊन उत्तरेस पूल ओलांडून मातीच्या घरात गेला. श्वान ऐंजल यास पुन्हा वास दिला असता त्याने वरीलप्रमाणे काम करुन नंतर दक्षिणेस लोकांचे गर्दीत रोडच्या कडेला बसलेल्य एका व्यक्तीजवळ जाऊन भुंकला. त्यावरुन सदर गुन्हा उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 8 | उस्माना-बाद | रॅम्बो - डॉबरमन | 1) पोहवा /1125<br>एस. पी. मुंढे<br>2) पोशि /1156<br>ए. एस. गणेश | शिरढोण पो. स्टे. गु.र.नं.75/2021 भा.द.वि. कलम 435,34 हा गुन्हा दि.25/3/2021 रोजी 20:00 वा. ते दि.26/3/2021 रोजी 03:30 वा. चे सुमारास घडला असून लोखंडी पाईप पान्हाचा वास श्वान रॅम्बो यास दिला असता श्वान शेतातून उत्तर बाजूस अंदाजे 2 कि.मी. अंतरावर एका घराजवळ जाऊन थांबला. सदर घरातील इसमांकडे तपास केला असता सदर गुन्हा उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| 9 | गोंदिया | ब्रुनो - लॅब्राडोर | 1) पोहवा /152 मिश्रा<br>2) पो. अंमलदार /2105 चव्हान | रामनगर पो. स्टे. गु.र.नं.54/2021 स्फोटक पदार्थ अधिनियम कलम 4,5 हा गुन्हा दि.03/3/2021 रोजी 09:00 वा. ते 15:00 वा. चे सुमारास घडला. सदर घटनास्थळी सर्च करण्याचा आदेश झाल्याने श्वान हस्तकांनी श्वान ब्रुनो याचे सहाय्याने जागेची पाहणी केली असता श्वान ब्रुनोने वास घेऊन भुंकून स्फोटके असल्याचे दर्शविले त्यावरुन मा. वरिष्ठांचे आदेशावरुन एस.ओ.पी. चे पालन करुन सदर स्फोटके सुरक्षित रित्या निष्क्रिय करण्यात आली. सदर स्फोटकामध्ये काळया रंगाची केबल, एलईडी बल्ब, एक ब्राऊन रंगाचे खरडे 3 इंच लांब ज्वलनशील वात मिळून आली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| **10** | गोंदिया | अँजेल - लॅब्राडोर | 1) पोना /1418 मेंढे<br>2) पोना /10 चंद्रिकापुरे | केशोरी पो. स्टे. गु.र.नं. 25/2021 भारतीय स्फोटक पदार्थ कायदा कलम 4, 5 हा गुन्हा दि.03/3/2021 रोजी 08:00 वा. ते 11:55 वा. चे सुमारास घडला. सदर घटनास्थळी सर्च करण्याचा आदेश झाल्याने श्वान हस्तकांनी श्वान अँजल याचे सहाय्याने जागेची पाहणी केली असता श्वान अँजलने वास घेऊन भुंकून स्फोटके असल्याचे दर्शविले त्यावरुन मा. वरिष्ठांचे आदेशावरुन एस.ओ.पी. चे पालन करुन सदर स्फोटके सुरक्षित रित्या निष्क्रिय करण्यात आली. सदर स्फोटकामध्ये जर्मन डब्बा 10 कि.लो. क्षमतेचा त्यात 09 इलेक्ट्रिक डेटोनेटर वायरसह, 03 जिलेटीन कांडया, 10 किलो पांढरी रंगाची स्फोटके पावडर मिश्रीत मिळुन आली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| **11** | गोंदिया | टॉम - लॅब्राडोर | 1) पोना /62 दिपक सांदेल | केशोरी पो. स्टे. गु.र.नं.25/2021 भारतीय स्फोटक पदार्थ कायदा कलम 4, 5 हा गुन्हा दि.03/3/2021 रोजी 08:00 वा. ते 11:55 वा. चे सुमारास घडला. सदर घटनास्थळी सर्च करण्याचा आदेश झाल्याने श्वान हस्तकांनी श्वान टॉम याचे सहाय्याने जागेची पाहणी केली असता श्वान टॉमने वास घेऊन भंुकून स्फोटके असल्याचे दर्शविले त्यावरुन मा. वरिष्ठांचे आदेशावरुन एस.ओ.पी. चे पालन करुन सदर स्फोटके सुरक्षितरित्या निष्क्रिय करण्यात आली. सदर स्फोटकामध्ये जर्मन डब्बा 10 कि.लो. क्षमतेचा त्यात 09<br><br>‡»ÖêŒ™üÒß?ú डेटोनेटर वायरसह, 03 जिलेटीन कांडया, 10 किलो पांढरी रंगाची स्फोटके पावडर मिश्रीत मिळुन आली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| **12** | धुळे | जॅक | 1) पोहवा /1109 आर.जे. जाधव<br><br>2) पोकाँ /1655 जी. बी. मंगळे | शिरपूर पो. स्टे. गु.र.नं.21/2021 भादवि कलम 302 गुन्हा दि.18/3/2021 रोजी 19:00 वा. चे सुमारास घडला. सदर घटनास्थळी एक पुरुष मृतावस्थेत पडलेला होता व जवळच रक्त लागलेला 4 ते 5 किलो वजनाचा दगड पडलेला होता. श्वान हस्तकांनी श्वान जॅक याचे सहाय्याने सदर जागेची पाहणी केली. पोलीस अधिकारी यांनी 14 संशयित इसमांना ओळख परेडकरिता आणले होते. श्वान जॅकला ओळख परेडसाठी आणलेल्या क्र.1 ते क्र.14 पर्यंत सर्वांचा वास दिला असता जॅक संशयित इसमाजवळ जाऊन भुंकू लागला आणि जॅकने दोन्ही पाय संशयित इसमाच्या अंगावर ठेवले. अशा प्रकारे श्वान इतर कोणत्याही व्यक्तीजवळ जाऊन भुंकला नाही. सदरील संशयित इसमाकडे अधिक चौकशी केली असता संशयित इसमाने दगडाचा वापर करुन हा गुन्हा मी केला आहे अशी गुन्हयाची कबुली त्याने दिली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| **13** | अकोला | लक्ष्मी - डॉबरमन | 1) सफौ ए. एम. जगताप<br>2) पोशि /2296 भारतसींह एस. ठाकूर | खदान पो. स्टे. गु. र. नं. 191/2021 भा. द. वि. कलम 302, 201 हा गुन्हा दि.07/3/2021 रोजी 01:30 वा. दरम्यान घडला असून घटनास्थळावर मिळून आलेल्या दगडाचा रक्त नसलेल्या भागाचा वास श्वान लक्ष्मी हीस दिला असता श्वान 100 मीटर अंतरावर रोडचे बाजुला सतरंजी, चादर विकणा-या दुकानाजवळ जावुन पलंगावरील इसमावर भुंकला श्वान लक्ष्मी हीस पुन्हा घटनास्थळावर आणुन घटनास्थळावरील विटेच्या तुकडयाचा वास दिला असता ती पुन्हा त्याच इसमाजवळ येवून भुंकून दाखवले सदर इसमाकडे तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले त्यावरून सदर गुन्हा उघडकीस आला. |




**अशा प्रकारे माहे मार्च 2021 मध्ये खुन-05, घरफोडी-01, चोरी-01, जळीत-01, स्फोटक पदार्थ-03, पळवुन नेणे-01 असे एकुण 12 गुन्हे श्वान पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.**